# जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे
# लिपिक टंकलेखक पदभरती परीक्षा (८ जून, २०१४)

## भाग – १ : मराठी

१) पुढील कविता वाचून त्याखालील प्रश्न क्रमांक १ ते ५ उत्तरे पर्यायातून निवडा.

आजीच्या जवळी घड्याळ कसले आहे चमत्कारिक
देई ठेवुनि ते कुठे अजुनी हे नाही कुणा ठाऊक.
त्याची टिक् टिक् चालते न कधीही, आहे मुके वाटते.
किल्ली देई न त्यास ती कधी, तरी ते सारखे चालते!
''अभ्यासास उठीव आज मजला आजी पहाटे तरी''
जेव्हा मी तीज सांगुनी निजतसे रात्री बिछान्यावरी,
साडेपाचही वाजतात न कुठे तो हाक ये नेमकी,
''बाळा झांजर जाहले, अरवला तो कोंबडा, ऊठ की!''
ताईची करण्यास जम्मत, तसे बाबूसवे भांडता
जाई संपुनिया सकाळ न मुळी पत्ता कधी लागता !
''आली ओटिवरी उन्हे बघ ! म्हणजे आजी, ''दहा वाजले!
जा जा लौकर !'' कानी तो घणघणा घंटाध्वनी आदळे
खेळाच्या अगदी भरात गढुनी जात आम्ही अंगणी
हो केव्हा तिन्हिसांज ते न समजे ! आजी परी आतुनी
बोले, ''खेळ पुरे, घरात परता ! झाली दिवेलागण,
ओळीने बसुनी म्हणा परवचा ओटीवरी येऊन !''
सांगे वेळ, तशाच वार–तिथीही आजी घड्याळ्यातुनी
थंडी पाऊस ऊनही कळतसे सारे तिला त्यातुनी !
मौजेचे असते घड्याळ दडुनी कोठे तिने ठेविले?
गाठोडे फडताळ शोधुनि तिचे आलो ! तरी ना मिळे!

१) कवी आजीला त्याला अभ्यासासाठी कधी उठवायला सांगतो?
१) सकाळी २) दुपारी ३) पहाटे ४) कोंबडा आरवल्यावर

२) आजीला घड्याळातून काय सांगता येते?
१) वेळ २) वार ३) तिथी ४) वेळ–वार – तिथी

३) दहा वाजता आजी काय करायला सांगते?
१) शाळेत जायला २) परवचा म्हणायला ३) अभ्यास करायला ४) खेळायला

४) आजीचे घड्याळ कवी कुठे शोधतो?
१) कप्प्यात २) पिशवीत ३) खोलीत ४) फडताळात

५) कवितेतील 'झांजर' या शब्दाचा अर्थ काय?
१) सकाळ २) दुपार ३) पहाट ४) एक वाद्य

६) : या चिन्हाला काय म्हणतात?
१) पूर्ण विराम २) अर्ध विराम ३) अपूर्ण विराम ४) संयोगचिन्ह

७) पुढीलपैकी शुद्ध शब्द ओळखा.
१) क्रीडांगण २) क्रीडांगण ३) क्रीडांगण ४) क्रीडांगण

८) ''निमंत्रण आले तर मी येईन.'' या वाक्यातील क्रियापदाचा अर्थ ओळखा.
१) स्वार्थी २) संकेतार्थी ३) विध्यर्थी ४) आज्ञार्थी

९) ''मी <u>स्वत:</u> त्याला पाहिले.'' या वाक्यातील अधोरेखित सर्वनाम कोणत्या प्रकारचे आहे?
१) आत्मवाचक २) दर्शक ३) अनिश्चित ४) पुरुषवाचक

१०) पुढीलपैकी समानार्थाची योग्य जोडी कोणती?

१) आदित्य – रवी　２) सविता – हिमांशू　३) भानू – इंदू　४) भास्कर – सुधाकर

११) पुढीलपैकी इतर व्यंजनाला 'न' जोडून तयार होणारे जोडाक्षर कोणते?
१) अन्न　२) अन्वय　३) स्वप्न　४) गुन्हा

१२) पुढीलपैकी कोणत्या वाक्यप्रकारात वाक्ये उभयान्वयी अव्ययांनी जोडली जातात?
१) मिश्र वाक्य　२) संयुक्त वाक्य　३) केवल वाक्य　४) केवल संयुक्त वाक्य

१३) 'अपरंपार कष्ट केल्याशिवाय वैभव प्राप्त होत नाही' हा अर्थ सूचित करणारी म्हण कोणती?
१) तळे राखील तो पाणी चाखील　२) पैसे झाडाला लागत नाहीत
३) दाम करी काम　४) टाकीचे घाव सोसल्याशिवाय देवपण येत नाही

१४) 'सधन' चा योग्य विरुद्धार्थी शब्द ओळखा.
१) श्रीमंत　२) धनिक　३) निर्धन　४) तालेवार

१५) 'गिरीश' या टोपणनावाने लेखन करणाऱ्या लेखकाचे नाव काय?
१) शंकर केशव कानिटकर　२) शंकर काशिनाथ गर्गे
३) शंकर काशिनाथ कानिटकर　४) शंकर केशव गर्गे

१६) पुढीलपैकी अपूर्ण भविष्यकाळाचे वाक्य ओळखा.
१) तो अभ्यास करत आहे.　२) तो अभ्यास करत होता.
३) तो अभ्यास करत असेल. ४) तो अभ्यास करेल.

१७) खालीलपैकी अनेकवचन होताना बदलणारा शब्द कोणता?
१) देवी　२) युवती　३) सुई　४) दासी

१८) 'मनाचे श्लोक' हे कोणत्या वृत्तामध्ये लिहिले आहेत?
१) मालिनी　२) भुजंगप्रयात　३) शार्दूलविक्रीडित　४) वसंततिलका

१९) पुढीलपैकी अशुद्ध शब्द ओळखा.
१) मूर्तिपूजा　२) स्तिमित　३) विनीत　४) स्मृती

२०) पुढील वाक्यात कोणते विरामचिन्ह वापरायचे राहिले आहे?
''शोभा म्हणाली, अमर किती छान बोलला !''
१) .　२) '' ''　३) ;　४) ?

२१) ''मुलांनी रोज शाळेत यावे.'' या वाक्यात किती नामांचे सामान्य रूप झाले आहे?
१) एक　२) दोन　३) तीन　४) चार

२२) 'हीन .......' ला जोडून येणारा शब्द कोणता?
१) दीन　२) दिन　३) गरीब　४) हवाला

२३) पुढील वाक्यातील अधोरेखित शब्द कोणत्या प्रकारचे विशेषण आहे?
''इथून <u>चौथा</u> बंगला, तो रामरावांचा !''
१) अनिश्चित　२) गणनावाचक　३) आवृत्तीवाचक　४) क्रमवाचक

२४) 'दुरात्मा' चा योग्य संधी विग्रह कोणता?
१) दुर् + आत्मा　२) दुः + आत्मा　३) दुरा + आत्मा　४) दुरा + त्मा

२५) ''<u>शेतात</u> <u>तलावाचे</u> पाणी नेले आहे.'' या वाक्यातील अधोरेखित शब्दांना कोणत्या विभक्तीचे प्रत्यय लागले आहेत?
१) चतुर्थी, पंचमी　२) पंचमी, षष्ठी　३) षष्ठी, सप्तमी　४) तृतीया, चतुर्थी

२६) 'ओ' हो कोणत्या प्रकारचा स्वर आहे?
१) संयुक्त　२) ऱ्हस्व　३) सजातीय　४) दीर्घ

२७) चुकीचा अर्थ असणारी जोडी शोधा.
१) जमदग्नी – रागीट व्यक्ती　२) लंकेची पार्वती – गरीब व्यक्ती
३) दीडशहाणा – मूर्ख व्यक्ती　४) भागूबाई – भित्री व्यक्ती

२८) 'देव' या शब्दाला पंचमीचा प्रत्यय लागून कोणता शब्द तयार होईल?
१) देवाने　२) देवाला　३) देवाची　४) देवाहून

२९) '<u>दिव्याची</u> वात' यातील अधोरेखित शब्दाचे सामान्य रूप कोणते?
१) दिवा　२) दिवे　३) दिव्या　४) दिव्यांची

३०) पुढीलपैकी देशी शब्द ओळखा.
१) शर्ट　२) टेबल　३) ग्लास　४) पोट

३१) पुढीलपैकी प्रत्ययघटित शब्द ओळखा.
१) बेइमान　२) फटफजिती　३) बिनचूक　४) जनक

३२) 'वारा' या शब्दाचा समानार्थी शब्द कोणता?
१) मारुत २) राजीव ३) अनल ४) कनक

३३) पुढीलपैकी कोणता शब्द 'निर' उपसर्ग लागून विरुद्धार्थी होणार नाही?
१) उत्साही २) अपराधी ३) उपाय ४) लायक

३४) ''गडावर भगवे निशाण फडकले.'' या वाक्यातील उद्देश विभाग कोणता?
१) गडावर २) गडावर भगवे निशाण ३) निशाण फडकले ४) फडकले

३५) 'क्' वर्गातील मृदू व्यंजने कोणती?
१) ग्, घ् २) ज्, झ् ३) ड्, ढ् ४) द्, ध्

३६) पुढीलपैकी वचनाच्या दृष्टीने चुकीची जोडी ओळखा.
१) सुई – सुया २) रजई – रजया ३) समई – समया ४) गवई – गवया

३७) संधी विग्रहाच्या दृष्टीने गटात न बसणारा शब्द कोणता?
१) राजेश २) उमेश ३) रमेश ४) गणेश

३८) ''<u>सैनिकांनो</u>, पुढे चला.'' या वाक्यातील अधोरेखित शब्दाचा कारकार्थ ओळखा.
१) संबोधन २) करण ३) अधिकरण ४) कर्ता

३९) 'शिक्षकांनी विद्यार्थ्यांना शिकवावे' हे कोणत्या प्रयोगाचे उदाहरण आहे?
१) कर्तरी २) भावे ३) कर्मणी ४) कर्म कर्तरी

४०) 'एकमेकांवर अवलंबून असणारे' या शब्दसमूहासाठी योग्य शब्द कोणता?
१) स्वावलंबी २) परस्परावलंबी ३) परावलंबी ४) अवलंबी

४१) पुढीलपैकी इंदिरा संत लिखित कवितासंग्रह कोणता?
१) श्यामला २) कदली ३) मृद्गंध ४) मृगजळ

४२) समासाचा प्रकार व उदाहरण या दृष्टीने चुकीची जोडी शोधा.
१) अष्टभुजा – बहुव्रीही २) चहापाणी – द्वंद्व
३) शेतकरी – तत्पुरुष ४) भवसागर – अव्ययीभाव

४३) पुढीलपैकी गटात न बसणारा लिंगवाचक शब्द ओळखा.
१) आजी २) दासी ३) देवी ४) धोबी

४४) तुमच्या शाळेत प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहिलेल्या व्यक्तीला कोणते पत्र लिहाल?
१) निमंत्रण पत्र २) चौकशी पत्र ३) आभार पत्र ४) अभिनंदन पत्र

४५) उपमेयाची उपमानाशी तुलना केली तर तो कोणता अलंकार होतो?
१) उपमा २) यमक ३) उत्प्रेक्षा ४) रूपक

पुढील उतारा वाचून त्याखालील प्रश्न–क्रमांक **४६** ते **५०** ची उत्तरे पर्यायातून निवडा.

गुरुजी पुढे म्हणाले, ''मला सर्वात आवडलं ते मनोजचे स्वप्न.'' सर्व मुलांची उत्सुकता आता ताणली जाऊ लागली. काय असेल मनोजचं स्वप्न?

गुरुजी म्हणाले, ''मनोजचं स्वप्न आहे – जगामध्ये धडधाकट, निरोगी लोकांना जन्म लाभावा. अपंगत्व मंदबुद्धी, वेडसरपणा असलेले जीन देवाने जन्माला घालू नयेत, आपल्या मनोजला जन्मापासून हालअपेष्टा सोसणाऱ्यांबद्दल अपार करुणा आहे.''

सगळा वर्ग तटस्थ होऊन गुरुजींचे बोलणे ऐकत राहिला. नंतर गुरुजींनी मनोजचे लेखन वाचून दाखवले शेवटचा भाग तर अंत:करणाचा गव घेणारा होता.

मनोजने लिहिले होते – ''देव आहे का नाही''? म्हणून मी देवाकडे जरी नाही, तरी सगळ्या धडधाकट माणसांकडे वर मागीन. प्रेमाचे मागणं मागीन, की धट्ट्याकट्ट्या माणसांनी दीनदुबळे, अपंग, मतिमंद, अशा माणसांशी मायेनं वागावं. त्या दुबळ्या जिवांचे मन आनंदी राखण्याचा प्रयत्न करावा. मला शास्त्रज्ञांच्या मेळाव्यात बोलण्याचे भाग्य मिळालं, तर त्यांच्याकडेही मागणं मागीन, कारण वैज्ञानिकांची ताकद प्रचंड आहे. वैज्ञानिकांजवळ मी मागणं मागीन, की सुंदर जगाचा नाश करणारे, माणसांना लुळे पांगळे करणारे बॉंब बनवण्यापेक्षा तुम्ही जन्मजात अपंग माणसांना धडधाकट करण्याचे शोध लावा. तुमची शक्ती, तुमची बुद्धी त्यासाठी वापरा.''

४६) मनोजने कोणते स्वप्न पाहिले आहे?
१) चंद्रावरची सफर करण्याचे २) निरोगी लोक जन्माला यावेत याचे
३) सर्कशीत काम करण्याचे ४) परीक्षा नको याबद्दलचे

४७) वरील उताऱ्यातील प्रसंग कुठे घडला असावा?
१) मैदानावर २) घरात ३) वर्गात ४) प्रयोगशाळेत

४८) मनोजच्या लेखनाचा शेवट कसा होता?
१) सुखद २) दु:खद ३) आनंदी ४) अंत:करणाचा ठाव घेणारा

४९) मनोज शास्त्रज्ञांना कोणत्या कामासाठी त्याची शक्ती व बुद्धी वापरण्याचे आवाहन करीत आहे?
१) माणसांना धडधाकट बनवण्याच्या कामासाठी २) माणसांना अपंग, अधू बनवण्याच्या कामासाठी
३) बॉंब बनवण्यासाठी ४) कष्टाची कामे कमी व्हावीत यासाठी

५०) मनोज कोणाकडे प्रेमाचे मागणे मागत आहे?
१) देवाकडे २) वैज्ञानिकांकडे ३) शिक्षकांकडे ४) मित्रांकडे

## भाग-२ : इंग्रजी

51) Fill in the blank with the most suitable 'Reflexive' pronoun :
"The king ........ was there."
1) him 2) himself 3) himselves 4) themselves

52) Choose the appropriate alternative :
" I met him at ...... church."
1) the 2) a 3) an 4) No article

53) Choose the word which best expresses the meaning of the given expression :
"A place of luggage at a railway stations."
1) Arena 2) Cage 3) Arsenal 4) Cloakroom

54) Identify the underlined 'clause' in the sentence. :
"You may sit wherever you like."
1) Adverb Clause of Place 2) Adverb Clause of Time
3) Adverb Clause of Manner 4) Adverb Clause of Purpose

55) Choose the one which can be substituted for the given sentence:
"To atone for one's sins."
1) Cancel 2) Repeal 3) Obliterate 4) Expiate

56) Choose the correct use of 'so ..... that' in the following sentence :
"The woman was too weal to carry a bundle of wood on her head."
1) The woman was so weak that she can't carry a bundle of wood on her head.
2) The woman is so weak that she can't carry a bundle of wood on her head.
3) The woman is so weak that she couldn't carry a bundle of wood on her head.
4) The woman was so weak that she couldn't carry a bundle of wood on her head.

57) Choose the appropriate alternative.
"She has a ...... character."
1) blotless 2) flawless 3) faultless 4) spotless

58) Find out which part of the sentence has an error :
"Krishnan and he have / a mutual friend / in Pune / No error."
A B C D
1) A 2) B 3) C 4) D

59) Choose the 'Grammatically' correct sentences :
1) She is not as wise as her brother. 2) She is not equally wise as her brother.
3) She is not as wise like her brother 4) She is not so wise as her brother.

60) Choose the correct 'Punctuated' sentence :
1) I study, Hindi, Marathi, English and Sanskrit.
2) I study, Hindi, Marathi, English and Sanskrit.
3) I study, hindi, marathi, English and Sanskrit.
4) I study, Hindi, marathi, English and Sanskrit.

61) Choose the correct 'Degree' sentence for the given sentence :
"No other planet is so big as Jupiter."
1) Jupiter is bigger than any other planet. 2) Jupiter is bigger than most other planet.
3) Jupiter is biggest than any other planet. 4) Jupiter is the biggest than most other planet.

Read the following passage and answer the questions by selecting the most appropriate alternatives : **(Q. No. 62 to 71)**

Our body is a wondrous mechanism and when subjected to unusual stress over a period of time, it adapts itself to deal more effectively with the stress. Therefore, when you exert your muscles against resistance, they are forced to adapt and deal with this extraordinary workload. This is the

principle of weight training. Strands of muscle fibres become thicker and stronger in response to the demands placed on them.

One of the great merits of weight training is the strength of your heart. During weight training, your heart is forced to beat faster and stronger in order to pump sufficient blood to the muscles being worked. In time, your heart, like your body, will adapt to this extra-workload by becoming stronger and more efficient. Since your body needs a given amount of blood to perform its daily tasks your heart will now need fewer beats to pump the same quantity of blood. Sounds good? There's more. Your circulatory system is given a thorough workout everytime your exercise, which increases its overall efficiency. Even the neural paths from your brain's command centres to each individual muscles become more effective, enabling easier recruitment of muscles fibres for carrying out physical tasks. In essence, your body becomes a well-oiled and finally tuned piece of machinery whirring along without any breakdown. In today's stress filled world, you need all the help you can get.

62) In the present world, the importance of physical exercise has :
1) increased 2) decreased 3) remained at the same level 4) none of these

63) How much blood does the heart pump at the same number of heartbeats, when exposed to excessive stress?
1) Same quantity 2) Less than before 3) More than normal 4) None of these

64) What does the above passage suggest?
1) We should carry out physical exercise as a routine.
2) Physical exercise is necessary occasionally.
3) We should ignore physical exercise.
4) We should subject our body to as much exercise as it can withstand.

65) What affects the nature of muscle fibres?
1) Intensity of Workload 2) Alimentary System
3) Nutrition 4) Stress imposed on them

66) What happens to out body due to physical exercise?
1) More efficient 2) Less efficient
3) Efficiency of the body remains the same 4) None of these

67) What is the principle of weight training?
1) Adapting the body to muscle force. 2) Adapting muscles to force implied on them.
3) Disposing extra-workload 4) Mechanized response to external conditions

68) How does the heart become stronger, owing to physical exercise?
1) Through acclimatization 2) Naturalization
3) Adapting to excessive workload 4) By accelerating the circulation of blood.

69) What does the term 'well-oiled' in the passage denote?
1) Health 2) Efficient 3) Massaged 4) None of these

70) What is the function of the heart?
1) Oxygenation of blood 2) Pumping the blood to the muscles
3) Pumping the blood to capillaries 4) Accelerating the circulation of blood

71) Which one of the following is the most appropriate title for the passage?
1) Health is Wealth 2) Exercise - its benefits
3) The mechanics of weight training 4) How to retain health

72) Choose the correct 'Questions Tag'
"Help me to solve this problem."
1) are you? 2) shall we? 3) aren't you ? 4) will you?

73) Choose the one which best expresses the following sentence in 'Indirect Narration' :
He said to me. "I shall excuse you for your mistake."
1) He told me that he should excuse me for my mistake.
2) He told me that he will excuse me for my mistake.
3) He told me that he would excuse me for my mistake.
4) He told me that I would excuse you for you mistake.

74) Name the type of the underlined adverb in the following sentence ;
"I am <u>fully</u> prepared."

1) Adverb of Reason 2) Adverb of Frequency
3) Adverb of Manner 4) Adverb of Quantity

75) Choose the most suitable preposition :
"Send the book ....... my address."
1) on 2) to 3) at 4) from

76) Choose the word which is closest in meaning to the given word:
'Indict'
1) Reprove 2) Cause 3) Catalogue 4) Accuse

77) Choose the correct 'Synonym' of the given word :
'Fantastic'
1) Sensational 2) Old 3) Obscene 4) Pale

78) Find the correctly spelt word :
1) Psychology 2) Psychology 3) Psykology 4) Sychology

79) Choose the correct use of 'Unless' in the following sentence.
" If we are not fair to other men, the world cannot be fair to us."
1) If we are not fair to other men unless the world cannot be fair to us.
2) Unless we are not fair to other men, the world cannot be fair to us.
3) Unless we are not fair to other men, the world couldn't be fair to us.
4) Unless we are fair to other men, the world cannot be fair to us.

80) Choose the most suitable 'Preposition' :
"The dish is not ....... my taste."
1) for 2) in 3) with 4) to

81) Choose the most suitable alternative :
"It gives me immense pleasure ......... you of her engagement.
1) to inform 2) in informing 3) to informing 4) to be inform

82) Choose the correct use of 'able to' in the following sentence :
"Can you play cricket?"
1) Are able to you play cricket? 2) Are you able to play cricket?
2) Are able you to play cricket? 4) Both (1) and (2)

83) Choose the correct alternative :
"I don't think I ....... be able to go."
1) can 2) should 3) shall 4) could

84) Choose the one which best expresses the meaning of the given idiom :
'To lose face'
1) To look angry 2) To be humiliated 3) To be helpless 4) To look vacant

85) Choose the word 'Opposite' in meaning to the given word :
'Tirade'
1) Submit 2) Abuse 3) Praise 4) Help

86) Choose the correct form of the verb to fill in the blank :
"Come in now, I am sorry ........ you waiting."
1) to keep 2) for keep 3) kept 4) to have kept

87) Name the type of the underlined noun in the following sentences :
<u>Wisdom</u> is better than strength.
1) Abstract Noun 2) Material Noun 3) Common Noun 4) Collective Noun

88) Choose the 'Grammatically Wrong' sentence :
1) I shall inform them this 2) He boarded the train.
3) A bunch of keys has been lost. 4) Ask him why he wastes his time.

89) Choose the most suitable alternative in accordance with the correct use of tense.
1) I have been writing six letters since morning. 2) I have writing six letters since morning.
3) I am writing six letters since morning. 4) I wrote six letters since morning.

90) Choose the appropriate alternative :
"She is ....... Indian artist married to ......... European engineer."
1) an, a 2) an, an 3) an, the 4) the, an

91) Name the 'Part of Speech' of the underlined word :

"A fair little girl sat under a tree."

1) Noun 2) Preposition 3) Adverb 4) Conjunction

92) Choose the suitable alternative.

"He was ...... to such labour."

1) abled 2) disliked 3) unaccustomed 4) unwanted

93) The young one of a hen is ........

1) pullet 2) heifer 3) eaglet 4) filly

94) Choose the one which best expresses the given sentence in Passive Voice :

"It is the time to buy books."

1) It is the time all the books to be bought 2) It is the time for the book to be bought

3) It is the time for books have been bought 4) It is the time for books to be bought.

95) Find out which part of the sentence has an error :

"He says that/ he has a car / beside a scooter / No error."

A B C D

1) A 2) B 3) C 4) D

96) Choose the word 'Opposite' in meaning to the given word :

'Vital'

1) Peripheral 2) Dead 3) Unimportant 4) Outer

97) Name the type of the underlined adjective in the following sentence :

" He showed much patience."

1) Adjective of Quality 2) Adjective of Number

3) Demonstrative Adjective 4) Adjective of Quantity

98) Choose the appropriate verb form :

"The complicated calculation of advertising elasticity ......... with hundreds of brands."

1) is made 2) have been made 3) has been made 4) is being made

99) Choose the most suitable word to fill in the blank :

"He is too .......... to be deceived easily."

1) strong 2) intelligent 3) kind 4) honest

100) Choose the most suitable alternative to make the sentence logical in sense.

"Piu ....... study after she had been married."

1) shall resume 2) resumed 3) have resumed 4) has resumed

## भाग – ३ : अंकगणित

१०१) एका आयताकार सभागृहाची लांबी १८ मीटर व रुंदी १५ मीटर आहे, तर त्या सभागृहात ०.२५ मीटर लांबीच्या चौरसाकृती किती फरश्या बसतील?

१) ४२३० २) २७०० ३) १०८० ४) ४३२०

१०२) ४०० च्या पुढची पाचवी विषम संख्या, सहावी सम संख्या व नववी विषम संख्या यांची बेरीज किती?

१) १२३० २) १२३२ ३) १२३६ ४) १२३८

१०३) एका चौरसाचे क्षेत्रफळ ५७६ चौ. सेमी. असल्यास त्या चौरसाची परिमिती किती असेल?

१) ४८ सेमी २) ९२ सेमी ३) ९६ सेमी ४) ५६ सेमी

१०४) एका चाकाची त्रिज्या १७.५ सेमी आहे, तर ३.३ किमी अंतर पार करण्यासाठी त्या चाकाचे किती फेरे होतील?

१) ३००० २) ६००० ३) १५०० ४) ६००

१०५) महेश व दिनेश यांच्या वयांची सरासरी १३ वर्षे आहे. दिनेश व सुरेश यांच्या वयांची सरासरी २० वर्षे आहे. जर महेश व सुरेश यांच्या वयांची बेरीज ३६ वर्षे असेल तर सुरेशचे वय किती वर्षे असेल?


१) १३ वर्षे २) १८ वर्षे ३) २० वर्षे ४) २५ वर्षे

१०६) PQRS मध्ये $m\angle P = m\angle R = ११०^\circ$ आणि $m\angle Q = m\angle S = ७०^\circ$ तर खालीलपैकी कोणत्या जोडीतील बाजू समांतर आहेत?

१) बाजू PQ व बाजू QR २) बाजू SR व बाजू SP

३) बाजू PQ व बाजू SR ४) बाजू PS व बाजू PQ

१०७) खालील आकृतीत दाखवण्याप्रमाणे एका आयताकृती बागेची लांबी ३२ मीटर व रुंदी २४ मीटर आहे. त्या बागेच्या मध्यभागी २ मीटर रुंदीचा रस्ता आहे, तर त्या रस्त्याचे म्हणजे रेखांकित भागाचे क्षेत्रफळ काढा :



१) १०८ चौमी  २) १०४ चौमी  ३) ११२ चौमी  ४) ६५६ चौमी

१०८) $\frac{0.९ \times 0.0९ \times 0.00९}{0.000९ \times ९}$ = किती?

१) 0.६  २) 0.00९  ३) 0.00९  ४) ९

१०९) खालील सामग्रीचा मध्यक काढा.
४१, ४१, ४२, ४१, ४३, ४२, ४१, ४४, ४२, ४३

१) ४१  २) ४२  ३) ४३  ४) ४४

११०) एका त्रिकोणाच्या तिन्ही कोनांची मापे अनुक्रमे $(x + १५)^\circ$, $(३x + ३0)^\circ$ आणि $(२x + १५)^\circ$ असतील, तर तो त्रिकोण कोणत्या प्रकारचा होईल?

१) लघुकोन त्रिकोण  २) काटकोन त्रिकोण  ३) विशालकोन त्रिकोण  ४) समद्विभुज त्रिकोण

१११) एका संख्येच्या पाच पटीतून १४ वजा करून मिळणारी बाकी ही त्याच संख्येच्या तिप्पटीमध्ये २२ मिळवल्यावर येणाऱ्या बेरजेइतकी आहे, तर ती संख्या कोणती?

१) १२  २) २२  ३) १८  ४) ४

११२) एका त्रिकोणाच्या तिन्ही कोनांची मापे अनुक्रमे $(५x + १0)^\circ$, $(३x + १५)^\circ$ व $(x + २0)^\circ$ आहेत, तर सर्वात मोठ्या कोनांचे माप किती असेल?

१) ३५°  २) ६0°  ३) ७५°  ४) ८५°

११३) मूळ वस्तूच्या छापील किमतीवर २0% सूट देऊन सुद्धा व्यापाराला २0% नफा होतो. छापील किंमत व मूळ किंमत यात ३५0 रुपयाचा फरक असेल, तर मूळ किंमत किती?

१) रु. १00  २) रु. २५0  ३) रु. ५00  ४) रु. ७00

११४) एका बाटलीची द्रव पदार्थ मावण्याची क्षमता २00 घनसेमी आहे, तर ३६ लीटर द्रव भरवण्यासाठी किती बाटल्या लागतील?

१) ७२  २) १८00  ३) १८  ४) १८0

११५) एका चौरसाची बाजू १0 सेमी असल्यास त्याच्या कर्णाची लांबी किती?

१) १0√२ सेमी  २) २0 सेमी  ३) ५ सेमी  ४) ५√२ सेमी

११६) दुधाच्या एका पिशवीची लांबी १२ सेमी व रुंदी ९ सेमी आहे. ३.६ मीटर बाजू असलेल्या चौरसाकृती प्लॅस्टिकच्या कागदापासून अशा किती पिशव्या तयार होतील?

१) ४00  २) ३00  ३) १२00  ४) ६00

११७) समीरने मशीन घेण्यासाठी एका बँकेकडून रु. ६,000 कर्ज घेतले होते. ३ वर्षे ६ महिन्यानंतर त्याने रु. १0,२00 भरून सर्व कर्ज फेडले, तर बँकेचा सरळव्याजाचा दर किती होता?

१) १८%  २) २४%  ३) १२%  ४) २0%

११८) वृत्तचिती आकाराच्या पाण्याच्या टाकीचा परीघ ४४ मीटर असून त्या टाकीची उंची १५ मीटर आहे, तर त्या टाकीत किती घनमीटर पाणी मावेल?

१) २११0  २) २३१0  ३) २२६0  ४) २४00

११९) एका चौकोनाच्या कोनांची मापे २ : ४ : ६ : ८ या प्रमाणात आहेत, तर तो चौकोन कोणत्या प्रकारचा असेल?

१) चौरस  २) समांतरभुज चौकोन  ३) समलंब चौकोन  ४) आयत

१२०) दोन संख्यांचा लसावि ३00 असून मसावि १५ आहे. दोन्ही संख्या दोन अंकी असतील तर त्यांपैकी मोठी संख्या कोणती?

१) ७५  २) ६0  ३) २0  ४) २५

१२१) ताशी ४0 किमी वेगाने जाणाऱ्या ४00 मीटर लांबीच्या मालगाडीला ४00 मीटर लांबीचा पूल ओलांडायला किती वेळ लागेल?

१) ७५ सेकंद  २) ७0 सेकंद  ३) ७२ सेकंद  ४) ३६ सेकंद


१२२) एका वर्तुळाचे क्षेत्रफळ ३८५0 चौ. सेमी. असेल, तर त्या वर्तुळाची त्रिज्या किती?

१) ३.५ सेमी  २) ३५ सेमी  ३) २८ सेमी  ४) १४ सेमी

१२३) एका समभुज चौकोनाच्या कर्णांची लांबी १८ सेमी व २४ सेमी आहे, तर त्या चौकोनाची परिमिती किती असेल?


१) ६० सेमी २) १५ सेमी ३) ४२ सेमी ४) ४० सेमी

१२४) खालील आकृतीत चौकोनाची मापे ३$x$ व २$x$ आहेत, तर $x$ची किंमत काढा.




१) ३६ २) १८ ३) ४० ४) २०

१२५) खालील आकृतीत रेषा EF ‖ रेषा CD व रेषा NM ही छेदिका जर m∠EAN = १०८°, तर १०८° − m∠CBA = किती?




१) ५२° २) ७२° ३) ८२° ४) १०८°

१२६) $\dfrac{(६.४)^२ - (३.६)^२}{(६.४)^२ + (३.६)^२ + २ \times ६.४ \times ३.६}$ = किती?

१) ०.०२८ २) ०.२८ ३) १० ४) २८०

१२७) एका कोनाचा पूरक कोन त्याच्या कोटिकोनाच्या अडीच पट आहे, तर पूरक कोनाचे माप किती?

१) १५०° २) १२०° ३) ६०° ४) ३०°

१२८) एका अर्धगोलाची त्रिज्या २१ सेमी आहे, तर त्या अर्धगोलाचे एकूण पृष्ठफळ काढा.

१) १३८६ चौसेमी २) ४१५८ चौसेमी ३) १३८६ घनसेमी ४) ४१५८ घनसेमी

१२९) राजा आणि राणी यांच्या वयांचे गुणोत्तर ६:५ आहे. राजाचे ६ वर्षांपूर्वीचे वय ३० वर्षे होते, तर राणीचे ५ वर्षानंतरचे वय किती असेल?

१) ३५ वर्षे २) २५ वर्षे ३) २० वर्षे ४) १५ वर्षे

१३०) दहा ग्रॅम सोन्याची किंमत २९,००० रुपये आहे, तर २३ ग्रॅम १७० मिलिग्रॅम सोन्याची किंमत किती असेल?

१) रु. ७६,१९३ २) रु. ६७,१९३ ३) रु. ६,७१९.३ ४) रू. ७,६१९.३

१३१) सचिनला ६०० रुपयांची वस्तू ५४० रुपयांची मिळाली, तर दुकानदाराने त्याला शेकडा किती सूट दिली?

१) १० २) १२ ३) १५ ४) २०

१३२) $\sqrt{१३.६९ \times ९००}$ = किती?

१) १११ २) ३० ३) ३३३ ४) ३७०

१३३) शकील हा इब्राहिमच्या दुप्पट काम करतो. एक काम करायला शकीलला १२ दिवस लागतात. त्या कामाला दोघांना मिळून किती दिवस लागतील?

१) १८ दिवस २) १२ दिवस ३) ८ दिवस ४) ६ दिवस


१३४) एका टि.व्ही. ची किंमत १२,५०० रुपये होती, पहिल्या वर्षी या किमतीत १०% वाढ झाली आणि दुसऱ्या वर्षी पुन्हा २०% वाढ झाली, तर त्या दूरदर्शन संचाची वाढलेली आत्ताची किंमत किती रुपये असेल?

१) १५,७५० २) १५,८६० ३) १६,५०० ४) १६,८००

१३५) $\sqrt{०.०००४४१}$ = किती?

१) ०.२१ २) २.१ ३) ०.००२१ ४) ०.०२१

१३६) खालील आकृतीत रेख AB हा वर्तुळाचा व्यास आहे. $l$(BC) = ५ सेमी $l$(AC) = १२ सेमी, तर वर्तुळाची त्रिज्या काढा.




१) १३ सेमी　२) ६.५ सेमी　३) १७ सेमी　४) ६ सेमी

१३७) एक रेषा Y अक्षाच्या डावीकडे व त्या अक्षाला समांतर असून अक्षापासून ३ एकक अंतरावर आहे, तर त्या रेषेचे समीकरण काय असेल?

१) $x$ = ३　२) $x$ = −३　३) $y$ = ३　४) $y$ = −३

१३८) एका इष्टिकाचिती आकाराच्या टाकीची लांबी रुंदीच्या दीडपट असून उंची लांबीच्या दुप्पट आहे. टाकीचे एकूण घनफळ ४५०० घनमीटर असल्यास टाकीची उंची किती असेल?

१) १० मी.　२) १५ मी.　३) २० मी.　४) ३० मी.

१३९) एका वर्तुळाचे क्षेत्रफळ १५४ चौसेमी व दुसऱ्या वर्तुळाचे ३८.५ चौसेमी आहे, तर त्या वर्तुळांच्या त्रिज्यांचे गुणोत्तर किती असेल?

१) ३ : १　२) ३ : २　३) २ : १　४) २ : ३

१४०) ८६३७९ + २०१९९७ + २७३८ + ७५८९२ = ?

१) २९७५८९२　२) २७५८९२　३) २९०८९२　४) ३६७००६

१४१) एका चौरसाची परिमिती ५२ सेमी आहे. तर त्या चौरसाला आतून स्पर्श करणाऱ्या वर्तुळाची त्रिज्या किती?

१) १.३ सेमी　२) ५.२ सेमी　३) ७.५ सेमी　४) ६.५ सेमी

१४२) $\Delta ABC$ चा G हा गुरुत्वमध्य आहे. मध्यगा AD ची लांबी ९ सेमी असेल तर AG ची लांबी किती?

१) ६ सेमी　२) ३ सेमी　३) ४.५ सेमी　४) ३.५ सेमी

१४३) दोन संख्यांचा गुणाकार २० असून त्यांच्या वर्गांची बेरीज ४१ आहे, तर त्या संख्यांची बेरीज किती असेल?

१) ९　२) १२　३) २०　४) ८

१४४) सर्वांत मोठी पाच अंकी संख्या आणि सर्वात मोठी चार अंकी संख्या यांच्यातील फरक किती असेल?

१) ९९९९०　२) ९००००　३) ९९९००　४) ९००९०

१४५) एका वृत्तचिती आकाराच्या लाकडी ओडक्याची त्रिज्या ३.५ सेमी असून त्यांची लांबी ४० सेमी आहे, तर त्या लाकडाचे घनफळ किती असेल?

१) १५४० घनसेमी　२) १२८० घनसेमी　३) ९२० घनसेमी　४) ७७० घनसेमी

१४६) एका वर्गातील ४० मुलांचे सरासरी वय १६.९५ आहे. परंतु एका नवीन मुलाने प्रवेश घेतल्याने सरासरी वय आता १७ वर्षे झाले, तर त्या नवीन मुलाचे वय किती?

१) १९ वर्षे　२) १८.५ वर्षे　३) १७.९ वर्षे　४) १७ वर्षे

१४७) सुरेशने २,०२,०२० रुपयात ५ गाड्या विकत घेतल्या, तर प्रत्येक गाडीची किंमत किती?

१) रु. ४४४　२) रु. ४,४४०　३) रु. ४०,४०४　४) रु. ४,०४४

१४८) निर्देशक प्रतलात (−२, −७) हा बिंदू कोणत्या चरणात असेल?

१) पहिल्या　२) दुसऱ्या　३) तिसऱ्या　४) चौथ्या

१४९) सरिताचे वय तिच्या दोन मुलांच्या बेरजेपेक्षा ८ वर्षांनी अधिक आहे. त्या दोन मुलांच्या वयातील फरक ३ वर्षे आहे. सरिताचे वय ४५ वर्षे असेल तर तिच्या मोठ्या मुलाचे वय किती?

१) २२ वर्षे　२) २१ वर्षे　३) २० वर्षे　४) १७ वर्षे

१५०) एक लोखंडी इष्टिकाचितीची मापे ५ सेमी, ८ सेमी व १४ सेमी आहेत. ती वितळवून तिच्यापासून ३.५ मिमी, १० मिमी, २० मिमी मापाचे इष्टिकाचिती आकाराचे लहान तुकडे बनवले तर किती तुकडे तयार होतील?

१) ४००　२) ८००　३) ६००　४) १४००

## भाग – ४ सामान्य ज्ञान

१५१) 'बॉक्साइट' हे खनिज खालील पर्यायांपैकी कोणत्या जिल्ह्यात आढळते?

१) भंडारा, गोंदिया　२) कोल्हापूर, चंद्रपूर　३) सिंधुदुर्ग, रायगड　४) रत्नागिरी, भंडारा

१५२) चंद्राच्या परिवलनाचा कालावधी पृथ्वीच्या परिवलनाच्या कालावधीच्या तुलनेत कसा आहे?

१) कमी　२) जास्त　३) समान　४) कमी किंवा जास्त

१५३) बंगालच्या उपसागरात कोणत्या बेटांचा समावेश आहे?
१) अंदमान –निकोबार २) मालदीव मॉरिशस ३) दादरा–नगर हवेली ४) लक्षद्वीप
१५४) एड्सचा (HIV) विषाणूचा शोध खालीलपैकी कोणत्या शास्त्रज्ञाने लावला?
१) डॉ. गॅलो २) डॉ. खुराणा ३) डॉ. कूक ४) रॉबर्ट कॉक
१५५) राष्ट्रीय सभेने एकमताने स्वीकारलेल्या चतु:सूत्रीतील नसणारी बाब खालील पर्यायांपैकी कोणती?
१) स्वराज्य २) राष्ट्रीय शिक्षण ३) स्वदेशी ४) प्रतियोगी सहकारिता
१५६) सोलापूर जिल्ह्यातील अभयारण्य कशासाठी प्रसिद्ध आहे?
१) व्याघ्र प्रकल्प २) मोर ३) गवा ४) माळढोक पक्षी
१५७) १५ व्या लोकसभेत महाराष्ट्रातून निवडून गेलेल्या पक्षांच्या खासदारांच्या संख्येनुसार योग्य उतरता क्रम कोणता?
१) राष्ट्रीय काँग्रेस पक्ष, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, भाजपा.
२) राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, भाजपा, शिवसेना, समाजवादी पक्ष.
३) राष्ट्रीय काँग्रेस पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, भाजपा, कम्युनिस्ट पक्ष.
४) राष्ट्रीय काँग्रेस पक्ष, शिवसेना, भाजपा, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष.
१५८) जिल्हा परिषदेचे अध्यक्ष यांच्याशी संबंधित अयोग्य पर्याय कोणता?
१) जिल्हा परिषदेच्या बैठकीचे अध्यक्ष २) स्थायी समितीचे पदसिद्ध अध्यक्ष
३) जिल्हा परिषद सदस्य ४) जिल्हा परिषदेचा प्रशासन प्रमुख
१५९) खालील पर्यायांपैकी खाऱ्या पाण्यात कोणत्या जातीच्या माशांची पैदास होते?
१) कटला २) मृगळ ३) रोहू ४) रेणवी
१६०) 'आर्य समाज' या संस्थेचे संस्थापक कोण?
१) राजा राममोहन रॉय २) दादोबा पांडुरंग तर्खडकर ३) स्वामी दयानंद सरस्वती ४) रामकृष्ण परमहंस
१६१) नोबेल पुरस्कार प्राप्त पहिले भारतीय शास्त्रज्ञ कोण?
१) डॉ. चंद्रशेखर वेंकटरामन २) डॉ. जगदीशचंद्र बोस
३) डॉ. हरगोविंद खुराणा ४) डॉ. सुब्रम्हण्यन चंद्रशेखर
१६२) राज्य शासनाकडून खालील पर्यायांपैकी कोणता कर आकारला जात नाही?
१) महामंडळ कर २) व्यवसाय कर ३) जमीन महसूल कर ४) शेती उत्पन्न कर
१६३) नांदेड जिल्ह्यात वास्तव्यास असणारी प्रमुख आदिवासी जमात खालील पर्यायांपैकी कोणती?
१) कोरकू २) गोंड ३) वारली ४) कोलाम
१६४) रेशीम किड्यासंबंधात खालीलपैकी योग्य विधान/विधाने कोणती?
अ) तुतीची पाने खाणाऱ्या किड्यापासून मजबूत रेशीम मिळते.
ब) ऐनाची पाने खाणाऱ्या किड्यांपासून टसर रेशीम मिळते.
१) फक्त (अ) २) फक्त (ब) ३) दोन्ही (अ) आणि (ब) ४) (अ) आणि (ब) दोन्ही नाही
१६५) केंद्र : महान्यायवादी : : राज्य : ?
१) कायदामंत्री २) राज्यपाल ३) महाधिवक्ता ४) लोकपाल
१६६) २०११ च्या जनगणनेनुसार लोकसंख्येचा दृष्टीने भारतातील दुसऱ्या क्रमांकाचे राज्य कोणते?
१) उत्तर प्रदेश २) महाराष्ट्र ३) बिहार ४) प. बंगाल
१६७) भारतातील मध्यवर्ती स्थान दर्शविणारे 'झीरो माइल' कोणत्या शहरात आहे?
१) अलाहाबाद २) रायपूर ३) भोपाळ ४) नागपूर
१६८) जागतिक व्यापार संघटनेचे (WTO) मुख्य कार्यालय कोठे आहे?
१) रोम २) पॅरिस ३) जिनिव्हा ४) न्यूयॉर्क
१६९) महात्मा गांधीच्या आंदोलनाशी संबंधित नसलेला पर्याय कोणता?
१) होमरुल लीग २) अहमदाबादचा कामगार लढा
३) असहकार चळवळ ४) सविनय कायदेभंग
१७०) IMF (आंतरराष्ट्रीय नाणेनिधी) चे मुख्यालय कोठे आहे?
१) न्यूयॉर्क २) पॅरिस ३) वॉशिंग्टन ४) जिनिव्हा
१७१) महाराष्ट्रात खालील पर्यायांपैकी कोणत्या ठिकाणी औष्णिक विद्युत केंद्र नाही?
१) परळी २) पारस ३) एकलहरे ४) भिवपुरी
१७२) भारतीय चित्ता या प्राण्याबद्दलचे योग्य विधान खालील पर्यायांपैकी कोणते?
१) चित्त्याच्या प्रजातींच्या संवर्धनाचा प्रकल्प सुरू आहे. २) हा प्राणी अस्तंगत झालेला आहे.
३) हा प्राणी दक्षिण आफ्रिकेतही सापडतो.
४) या प्राण्याचे संवर्धन व संरक्षण करणे आवश्य वाटत नाही.

१७३) 'पुणे करार' कोणाकोणात झाला?
१) लोकमान्य टिळक – शाहू महाराज
२) महात्मा गांधी – डॉ. बाबासाहेब आंबेडकर
३) पंडित नेहरू – डॉ. बाबासाहेब आंबेडकर
४) लोकमान्य टिळक – गोपाल गणेश आगरकर

१७४) गहू या पिकावरील तांबेरा रोग कशामुळे पडतो?
१) बुरशी २) रोगजंतू ३) सूक्ष्म रोगजंतू ४) प्रखर सूर्यप्रकाश

१७५) शासनाने महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती कायदा कोणत्या समितीच्या शिफारशीनुसार मंजूर केला?
१) पी. बी पाटील समिती
२) वसंतराव नाईक समिती
३) फाजल अली समिती
४) धनंजय गाडगीळ समिती

१७६) नियोजन आयोगाचे पदसिद्ध अध्यक्ष कोण असतात?
१) अर्थमंत्री २) राष्ट्रपती ३) रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर ४) पंतप्रधान

१७७) १८५७ च्या उठावाच्यावेळी पश्चिम बिहारमध्ये लढ्यात उतरणारे कुंवरसिंह कुठले जमीनदार होते?
१) जगदीशपूर २) पाटणा ३) गोरखपूर ४) अहमदपूर

१७८) 'मी वनवासी' हे कोणाचे आत्मचरित्र आहे?
१) अनुताई वाघ २) मेधा पाटकर ३) विजयाताई चौक ४) सिंधुताई सपकाळ

१७९) संघशासनाच्या कायदेमंडळात कोणाचा समावेश होत नाही?
१) सर्वोच्च न्यायालय २) राष्ट्रपती ३) राज्यसभा ४) लोकसभा

१८०) कोणत्याही माध्यमाचे तापमान वाढविल्यास ध्वनीच्या वेगावर काय परिणाम होतो?
१) वाढतो २) कमी होतो ३) स्थिर राहतो ४) वाढतो किंवा कमी होतो

१८१) 'नवीकरणीय ऊर्जास्रोत' म्हणून खालील पर्यायांपैकी कोणत्या वनस्पतीचा उपयोग केला जातो?
१) नागचंपा २) सर्पगंधा ३) सोनचाफा ४) गुळवेल

१८२) खेळ– खेळाडू यांची अयोग्य जोडी कोणती?
१) धावपटू – शायनी विल्सन
२) नेमबाजी – शायनी अब्राहम
३) जलतरणपटू – रूपाली रेपाळे
४) कबड्डी – दीपिका जोसेफ

१८३) खालीलपैकी अयोग्य जोडीचा पर्याय कोणता?
१) तैनाती फौज – लॉर्ड वेलस्ली
२) विधवा पुनर्विवाहाचा कायदा – लॉर्ड डलहौसी
३) दुहेरी राज्यव्यवस्था – रूपाली रेपाळे
४) पाश्चात्त्य शिक्षणाची सुरुवात – लॉर्ड कॉर्नवॉलीस

१८४) खालील पर्यायांपैकी नदी–उपनदी यांची अयोग्य जोडी कोणती?
१) तापी – पाझरा २) गोदावरी – प्रवरा ३) कृष्णा – प्राणहिता ४) भीमा –नीरा

१८५) वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ कोठे आहे?
१) हिंगोली २) परभणी ३) औरंगाबाद ४) जालना

१८६) मानवी रोग आणि त्यांचे कारक घटक यांची अयोग्य जोडी असणारा पर्याय कोणता?
१) कावीळ – विषाणू २) क्षय – प्रोटोझोआ ३) डांग्या खोकला– जिवाणू ४) नायरा – कवक

१८७) बांग्लादेशाला भारतीय कोणत्या राज्याची सीमा लागून नाही?
१) आसाम २) मेघालय ३) सिक्कीम ४) त्रिपुरा

१८८) राष्ट्रपती हे देशाचे ........ नसतात.
१) नामधारी प्रमुख २) कार्यकारी प्रमुख ३) घटनात्मक प्रमुख ४) वास्तव प्रमुख

१८९) 'ब्रिक्स' या जागतिक पातळीवरील देशांच्या संघटनेत समाविष्ट नसलेला देश कोणता?
१) चीन २) भारत ३) ब्रिटन ४) रशिया

१९०) 'जागतिक ग्राहक दिन' कोणता?
१) २४ डिसेंबर २) १५ मार्च ३) २२ एप्रिल ४) २५ जानेवारी

१९१) 'मार्टिन ल्यूथर' हे कोणत्या धर्मपंथाशी संबंधित होते?
१) कॅथलिक २) प्रोटेस्टंट ३) फॅसिस्ट ४) नाझी

१९२) 'अमृतक्रांती' कशाशी संबंधित आहे?
१) दुग्धोत्पादनात वाढ २) फलोत्पादनात वाढ ३) रस्ते विकास ४) नद्याजोड प्रकल्प

१९३) इंद्रधनुष्यातील सर्वात खालचा रंग कोणता?
१) तांबडा २) हिरवा ३) जांभळा ४) पिवळा

१९४) पृथ्वीभोवतालच्या वातावरणात कोणत्या थरात वादळे, ढग, पाऊस यांची निर्मिती होते?
१) तपांबर २) मध्यांबर ३) आयनांबर ४) बाह्यांबर

१९५) 'विक्रम साराभाई स्पेस सेंटर' कोठे आहे?

१) श्रीहरिकोटा २) थुंबा ३) कल्पकम ४) हसन

१९६) दुसऱ्या बाजीराव पेशव्यांनी इंग्रजांशी केलेला 'तैनाती फौजेचा करार' काय म्हणून प्रसिद्ध आहे?
१) सालबाईचा तह २) वसईचा तह ३) बारभाईचा तह ४) पानिपतचा तह

१९७) शिवरायांनी संस्कृत भाषेत तयार करवून घेतलेला राज्यव्यवहार कोष कोणत्या भाषेतील शब्दांना पर्याय होता?
१) हिंदी २) उर्दू ३) फार्सी ४) पाली

१९८) खालील पर्यायांपैकी चुंबकीय गुणधर्म असणाऱ्या मूलद्रव्याची संज्ञा कोणती?
१) Cu २) Al ३) Ra ४) Co

१९९) 'नेहरू अहवाल' तयार करणाऱ्या सर्वपक्षीय समितीचे अध्यक्ष कोण होते?
१) प. जवाहरलाल नेहरू २) पंडित मोतीलाल नेहरू ३) अरुण नेहरू ४) इंदिरा गांधी

२००) भारताने विकसित केलेले 'अस्त्र' हे क्षेपणास्त्र कोणत्या प्रकारचे आहे?
१) हवेतून हवेत मारा करणारे २) जमिनीवरून जमिनीवर मारा करणारे
३) जमिनीवरून हवेत मारा करणारे ४) हवेतून जमिनीवर मारा करणारे

## उत्तरे : जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे

## लिपिक टंकलेखक पदभरती परीक्षा (८ जून, २०१४)

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १-३ | २-४ | ३-१ | ४-४ | ५-३ | ६-३ | ७-२ | ८-२ | ९-१ | १०-१ |
| ११-३ | १२-२ | १३-४ | १४-३ | १५-१ | १६-३ | १७-३ | १८-२ | १९-१ | २०-१ |
| २१-२ | २२-१ | २३-४ | २४-२ | २५-३ | २६-१ | २७-२ | २८-४ | २९-३ | ३०-४ |
| ३१-४ | ३२-१ | ३३-४ | ३४-२ | ३५-१ | ३६-४ | ३७-४ | ३८-१ | ३९-२ | ४०-२ |
| ४१-४ | ४२-४ | ४३-४ | ४४-३ | ४५-१ | ४६-२ | ४७-३ | ४८-४ | ४९-१ | ५०-२ |
| ५१-२ | ५२-१ | ५३-४ | ५४-१ | ५५-४ | ५६-४ | ५७-३ | ५८-२ | ५९-१,४ | ६०-२ |
| ६१-१ | ६२-१ | ६३-२ | ६४-१ | ६५-४ | ६६-१ | ६७-२ | ६८-३ | ६९-१ | ७०-२ |
| ७१-३ | ७२-४ | ७३-३ | ७४-४ | ७५-२ | ७६-४ | ७७-१ | ७८-१ | ७९-४ | ८०-४ |
| ८१-१ | ८२-२ | ८३-३ | ८४-२ | ८५-३ | ८६-४ | ८७-१ | ८८-१ | ८९-१ | ९०-१ |
| ९१-२ | ९२-३ | ९३-१ | ९४-४ | ९५-३ | ९६-३ | ९७-४ | ९८-२ | ९९-२ | १००-२ |
| १०१-४ | १०२-४ | १०३-३ | १०४-१ | १०५-४ | १०६-३ | १०७-१ | १०८-२ | १०९-२ | ११०-२ |
| १११-३ | ११२-४ | ११३-४ | ११४-४ | ११५-१ | ११६-४ | ११७-४ | ११८-२ | ११९-३ | १२०-१ |
| १२१-२ | १२२-२ | १२३-१ | १२४-१ | १२५-२ | १२६-२ | १२७-१ | १२८-२ | १२९-१ | १३०-२ |
| १३१-१ | १३२-१ | १३३-३ | १३४-३ | १३५-४ | १३६-२ | १३७-२ | १३८-४ | १३९-३ | १४०-४ |
| १४१-४ | १४२-१ | १४३-१ | १४४-२ | १४५-१ | १४६-१ | १४७-३ | १४८-३ | १४९-३ | १५०-२ |
| १५१-३ | १५२-२ | १५३-१ | १५४-१ | १५५-४ | १५६-४ | १५७-४ | १५८-४ | १५९-४ | १६०-३ |
| १६१-१ | १६२-१ | १६३-२ | १६४-२ | १६५-३ | १६६-२ | १६७-४ | १६८-३ | १६९-१ | १७०-३ |
| १७१-४ | १७२-२ | १७३-२ | १७४-१ | १७५-२ | १७६-४ | १७७-१ | १७८-४ | १७९-१ | १८०-१ |
| १८१-१ | १८२-२ | १८३-४ | १८४-३ | १८५-२ | १८६-२ | १८७-३ | १८८-४ | १८९-३ | १९०-२ |
| १९१-२ | १९२-४ | १९३-३ | १९४-१ | १९५-२ | १९६-२ | १९७-३ | १९८-४ | १९९-२ | २००-१ |